# University of Mumbai


गुण व प्रमाणपत्र कक्ष,
परीक्षा विभाग,
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०० ०९८.


क्र.परीक्षा/गुण व प्रमाणपत्र कक्ष/३१ /२०१८.

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, आपणा सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ दि. २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झाला असुन, पदवी प्रमाणपत्र संबंधित विभाग/महाविद्यालय/संस्था यांच्याकडे पोहोच करण्याचे काम सुरु असुन, संबंधितांनी दि. ०१ मार्च ते १५ मार्च, २०१८ या कालावधी दरम्यान पदवी प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम आयोजित करुन संबंधित विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरणाबाबत परिपत्रक निर्गमित करुन कळविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे वितरण करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास असे प्रमाणपत्र संबंधितांनी महाविद्यालयात जमा करावे व संबंधित महाविद्यालयाने त्यांच्याकडे सुधारणा करणे कामी प्राप्त असलेले पदवी प्रमाणपत्र एकत्र करुन त्यात सुधारणा करणे कामी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील संबंधित कक्षाकडे हस्तेपोच आणून द्यावी; जेणेकरुन विभागाला या प्रमाणपत्रांमध्ये सुधारणा करुन सुधारित प्रमाणपत्र शक्य तितक्या लवकर संबंधित महाविद्यालयाकडे सुपूर्त करणे शक्य होईल व विद्यार्थ्यांची संभाव्य गैरसोय टाळता येईल.

उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या निदर्शनास आणून द्यावी ही नम्र विनंती.

मुंबई — ४०००९८.
दि. ०५ मार्च, २०१८.

प्र. संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरु यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक